MHBU070011432023

<u>निशाणी क्रमांक ५ वरील आदेश</u>

(दि. ३०/०८/२०२४ रोजी पारीत)

अर्जदाराने मुळ अर्ज महिलांचा घरगुती हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ अन्वये दाखल करण्यात आलेला आहे. सदरील कायद्याचे अर्जदाराने कलम २३ नुसार प्रस्तूत अर्ज अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल करण्यात आला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ ची पत्नी असून त्यांचा विवाह दि. १२.१२.२०२१ रोजी शेगाव येथे रितीरिवाजानुसार संपन्न झाला. गैरअर्जदार क्र. २ व ३ हे गैरअर्जदाराचे सासुसासरे आहेत. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदारांकडे नांदण्याकरीता गेली असता सुरवातीचे चार पाच दिवस गैरअर्जदारांनी तिला चांगली वागणुक दिली परंतु त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार हिला ''तु उंद्री आहेस, तु मला पसंत नव्हती, तरी मी लग्न केले'' असे म्हणत होता. तसेच गैरअर्जदार क्र. १ ते ३ हे अर्जदारास ''तु भिकारचोटाची आहेस, लग्नात आमची बरोबर व्यवस्था झाली नाही, तुझे वडिलांकडुन रुपये ५० हजार रुपये आण'' असे म्हणुन तिच्याकडे तगादा लावीत होते. गैरअर्जदार हे संशयी वृत्तीचे असुन अर्जदारास घराच्या बाहेर निघु देत नव्हते तसेच तिला कोणाशी बोलु देत नव्हते. अर्जदाराने तिचे अर्जात पुढे कथन केले की एक वेळ अर्जदाराचा आतेभाऊ तिच्या घरी आला होता व त्यावेळी गैरअर्जदाराने अर्जदारास ''तु त्याच्या कडे का पाहिले'' असे म्हणुन अर्जदाराच्या डोळ्यावर बुक्का मारुन तिचा डोळा फोडला होता. गैरअर्जदार क्र. १ यास दारुचे व्यसन असुन अनेक वेळा गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदारास दारुच्या नशेत मारहाण केली. त्यावर गैरअर्जदार क्र. १ च्या भावाने गैरअर्जदारास बरेचवेळा समजुन

सांगण्याचा प्रयत्न केला परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही. अर्जदार ही गैरअर्जदारांचा सर्व त्रास सहन करुन संसार करीत होती. गैरअर्जदार क्र. १ याने दोन तीन वेळा अर्जदारास मारठोक करुन तिचे माहेरी सोडुन दिले. तसेच गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदाराच्या आईवडिलांचा फोनवरुन शिवीगाळ करुन त्यांचा अपमान करीत होता. तरीसुध्दा अर्जदाराचे आई वडिलांनी तिला गैरअर्जदाराकडे नांदण्याकरीता पाठविले. गैरअर्जदाराच्या त्रासामुळे अर्जदारास एक वेळा नांदुरा येथील रुग्णालयात भरती करावे लागले होते. अर्जदार ही गैरअर्जदारांकडे नांदत असताना गैरअर्जदार क्र. १ हा हातात दोरी घेऊन अर्जदारास फाशी घेण्यास सांगत होता तसेच अर्जदाराची गच्ची दाबत होता.

३. अर्जदाराने तिच्या अर्जात पुढे कथन केले की सन २०२२ चे दिवाळी नंतर अर्जदार तिचे माहेरी आली असता गैरअर्जदारांनी अर्जदाराचे आईला फोन करुन ''तुमची मुलगी आणुन घातली तर आमच्यावर तिची जबाबदारी राहणार नाही, पैसोड्याची एक मुलगी आम्ही मारली व जेल सुध्दा भरुन आलो'' असे म्हटले होते. त्यावरुन गैरअर्जदारांकडे अर्जदाराच्या जिवाला धोका असल्यामुळे अर्जदार ही सन २०२२ च्या दिवाळी पासुन गैरअर्जदारांकडे नांदायला गेली नाही. तेव्हापासुन अर्जदार ही तिच्या आई वडिलांच्या भरवश्यावर तिचे माहेरी जिवन जगत आहे.

४. अर्जदार तिच्या माहेरी राहते तेव्हापासुन गैरअर्जदार क्र. १ ने तिची कोणतीही विचारपुस केली नाही तसेच तिला नांदवायला घेऊन जाण्याचा प्रयत्न सुध्दा केला नाही. अर्जदार व तिच्या आई वडिलांनी मे २०२३ मध्ये मध्यस्थामार्फत गैरअर्जदारास समजुन सांगण्याचा प्रयत्न केला परंतु गैरअर्जदारांनी अर्जदाराच्या आई वडिलांना तुमच्या पोरीला नांदवायचे असल्यास त्यांच्याकडे रुपये दोन लाखाची मागणी केली. त्यामुळे अर्जदाराने दि. १२.०५.२०२३ रोजी वकीलामार्फत गैरअर्जदारांना

नोटीस पाठविली परंतु गैरअर्जदाराने सदरची नोटीस स्वीकारली नाही.

५. अर्जदार हिला कोणतेही आर्थीक साधन नाही. याउलट, गैरअर्जदाराकडे पिंपळगांव काळे येथे सुपीक तीन एकर जमीन असुन त्यापासुन त्यांना दरवर्षी चार ते पाच लाखाचे उत्पन्न मिळते. तसेच गैरअर्जदार क्र. १ हा भाजीपाल्याचा व्यवसायातुन दररोज रुपये ५००/– कमावतो. त्याचप्रमाणे गैरअर्जदार यांचे पिंपळगाव काळे येथे पक्के राहते घर असुन एक प्लॉट सुध्दा आहे. तसेच गैरअर्जदार क्र. २ व ३ हे मजुरीने काम करतात त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ याचे वर अर्जदाराव्यतिरीक्त इतर कोणाचीही जबाबदारी नाही. सर्व गैरअर्जदार हे अर्जदाराचा शारीरिक, मानसिक व आर्थीक छळ करुन तिची जबाबदारी नाकारीत आहेत. त्यामुळे तिच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नसुन तिला गैरअर्जदाराकडून दरमहा एकुण खर्च रुपये ७,०००/– (रुपये सात हजार) मिळण्याची विनंती अर्जदाराने केली आहे.

६. गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी त्यांचे लेखी उत्तर नि. ०९ वर दाखल करुन अर्जदाराशी असलेले नातेसंबंध मान्य केलेले आहे. परंतु अर्जामधील ईतर कौटुंबिक हिंसाराच्या अनुषंगाने असलेला मजकुर खोटा असल्याचे सांगुन अमान्य केला आहे. गैरअर्जदाराने विशेष कथनामध्ये असे नमूद केले आहे की, अर्जदाराच्या माहेरची आर्थीक परिस्थीती अत्यंत हलाखीची असल्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे लग्न साध्या पध्दतीने संपन्न झाले होते. तसेच अर्जदाराच्या घरची परिस्थीती पाहता गैरअर्जदारांनी दोनही पक्षाकडील लग्नाचा बस्ता तसेच दागदागीणे याचा खर्च गैरअर्जदारांनी केला होता. गैरअर्जदारांच्या कथनानुसार अर्जदाराचा स्वभाव अत्यंत रागीट असल्याने छोट्या छोट्या कारणावरुन अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ व त्याच्या आई वडिलांचा अपमान करीत होती. गैरअर्जदार क्र. १ शेतात कामाकरीता गेला असता

अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ याचा डब्बा सुध्दा बनवित नव्हती. अर्जदाराने गैरअर्जदार क्र. १ यास संसार सुखापासुन वंचित ठेवले त्यामुळे गैरअर्जदाराने त्याबाबत अर्जदाराकडे विचारणा केली असता अर्जदाराने गैरअर्जदार क्र. १ हा तिला पसंत नसुन तिला गैरअर्जदार क्र. १ पासुन फारकती पाहिजे असल्याचे सांगीतले. गैरअर्जदारांनी पुढे कथन केले की एक वेळ अर्जदाराच्या मामांनी गैरअर्जदार क्र. १ यास मारहाण केली होती तसेच त्यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली होती. त्यावरुन गैरअर्जदार क्र. १ याने पोलीस स्टेशन जळगाव जामोद येथे रिपोर्ट सुध्दा दिलेला आहे. गैरअर्जदारांच्या कथनानुसार अर्जदार ही स्वतःच्या इच्छेने कोणतेही संयुक्तीक कारण नसताना तिचे माहेरी राहत आहे. गैरअर्जदार व त्याच्या नातेवाईकांनी आपसी समझोता करण्याचा बरेचवेळा प्रयत्न केले परंतु अर्जदार व तिच्या आईवडिलांनी त्यांना कोणताही प्रतिसाद दिला नाही. गैरअर्जदार हा आजरोजी सुध्दा अर्जदारास सुखासमाधाने नांदविण्यास तयार आहे. अर्जदाराच्या हेकेखोर पणामुळे गैरअर्जदारास संसार सुखापासुन वंचित रहावे लागत आहे. गैरअर्जदारांच्या कथनानुसार अर्जदार ही तिच्या माहेरी शिलाई मशिनचे व इतर काम करुन दररोज रु. ३००/– ते ४००/– कमावते त्यामुळे ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे. गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी अर्जदार हिच्यावर घरगुती हिंसाचार केल्याबाबत डोमेस्टीक इन्सीडेंट रिपोर्ट सुध्दा दाखल केला नसल्यामुळे प्रथम दर्शनी प्रकरण खारीज होण्यास पात्र आहे.

७. अर्जदार क्र. १ ने गैरअर्जदारांविरुध्द कौटुंबिक हिंसाचार केल्याबाबत आरोप केलेले आहे. सदर आरोप गैरअर्जदारांनी नि.क्र. ०९ खाली उत्तर दाखल करुन फेटाळून लावलेले आहे. परंतू या टप्यावर गैरअर्जदारांनी अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केला आहे किंवा नाही हे बघता येणार नाही. अर्जदाराने सदर अर्ज शपथेवर

दाखल करुन गैरअर्जदारां विरुध्द कौटुंबिक हिंसाचार केल्याबाबत आरोप केलेले आहेत. वास्तविक कौटुंबिक हिंसाचार झाला किंवा नाही पुरावा झाल्यानंतर सिध्द होईल. परंतू या टप्यावर अर्जदाराने शपथेवर दाखल केलेला अर्जाचा विचार करणे न्यायोचित राहील.

८. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांच्यामध्ये नातेसंबंधाबाबत वाद नाही. संपूर्ण प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदारांकडे नांदण्याकरीता गेली असता सुरवातीचे चार पाच दिवस गैरअर्जदारांनी तिला चांगली वागणुक दिली परंतु त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार हिला ''तु उंद्री आहेस, तु मला पसंत नव्हती, तरी मी लग्न केले'' असे म्हणत होता. तसेच गैरअर्जदार क्र. १ ते ३ हे अर्जदारास ''तु भिकारचोटाची आहेस, लग्नात आमची बरोबर व्यवस्था झाली नाही, तुझे वडिलांकडुन रुपये ५० हजार घेऊन ये'' असा तगादा लावीत होते. गैरअर्जदार हे संशयी वृत्तीचे असुन अर्जदारास घराच्या बाहेर निघु देत नव्हते तसेच तिला कोणाशी बोलु देत नव्हते. अर्जदाराने तिचे अर्जात पुढे कथन केले की एक वेळ अर्जदाराचा आतेभाऊ तिच्या घरी आला होता व त्यावेळी गैरअर्जदाराने अर्जदारास ''तु त्याच्या कडे का पाहिले'' असे म्हणुन अर्जदाराच्या डोळ्यावर बुक्का मारुन तिचा डोळा फोडला होता. कोणतीही महिला आपल्या पतीविरुध्द न्यायालयात विनाकारण अर्ज देवू शकत नाही. अर्जदारने दाखल केलेल्या अर्जावरुन हे प्रथमदर्शनी स्पष्ट होते की, तिला कौटूंबिक हिंसाचार भोगावा लागलेला आहे. त्याबाबतचे सविस्तर वर्णन मुळ अर्जात केलेले आहे. मुळ अर्जाचा निकाल लागण्यास उशीर लागू शकतो. अशा परिस्थीतीत, प्रथमदर्शनी अर्जदाराला कौटूंबिक हिंसाचार भोगावा लागल्याचे दिसून येते. सबब, अर्जदार अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे.

९. अंतरीम पोटगी ठरवितांना विविध घटक विचारात घेणे आवश्यक ठरते. मा. उच्च न्यायालय ***रजनेश –वि– नेहा फौ.अपील क्र. ७३०/२०२०*** अन्वये पोटगीचा आदेश करण्यापूर्वी मुलभूत गोष्टी लक्षात घेणे गरजेचे आहे असे सांगीतले आहे. त्याअनुषंगाने अर्जदार व गैरअर्जदार यांची आर्थीक परिस्थीती, त्यांना जीवन जगण्यासाठी लागणारा खर्च, त्यांचे राहणीमान, औषधोपचार, मुलभूत गरजा ईत्यादी घटक प्राधान्याने विचारात घेणे आवश्यक ठरते. पोटगी मंजूर करतांना दोन्ही बांजूचा विचार करणे गरजेचे असते. गैरअर्जदाराची आर्थीक परिस्थीती आणि अर्जदाराचा अपेक्षीत खर्च यामध्ये समतोल साधणारी पोटगीची रक्कम मंजूर करणे योग्य ठरते. अर्जदाराला सांभाळणे, तिचे पालनपोषण करणे हे गैरअर्जदाराचे कायदेशीर आणि नैतीक कर्तव्य असल्याचे सिध्द झालेले आहे. अर्जदाराने तिचे संपत्ती व दायित्वा संदर्भात शपथपत्र नि.क्र. १२ दाखल केले आहे. त्यामध्ये गैरअर्जदार क्र. १ हा भाजीपाल्याचा व्यवसाय करीत असुन त्यापासुन दररोज रु. ५००/– कमावतो. तसेच गैरअर्जदाराचे पिंपळगाव काळे येथे पक्के मकान असून स्वतःचा प्लॉट सुध्दा आहे. त्याचप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ कडे ओलीताची तीन एकर शेती असून शेतातून वार्षीक ४,००,०००/– रुपयांचे उत्पन्न होते. परंतू अर्जदाराने हे दाखविण्यासाठी कोणतेही दस्ताऐवज अभिलेखावर दाखल केले नाही.

१०. याउलट गैरअर्जदार क्र. १ ने त्यांचे संपत्ती व दायीत्वाचे शपथपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही मा. सर्वोच्च न्यायालयाने रजनेश –वि– नेहा (सुप्रा) या प्रकरणात जर दोनही पक्षापैकी एखादा पक्ष संपत्ती व दायीत्वाचे शपथपत्र अभिलेखावर दाखल करत नसेल तर त्याच्या विरुध्द प्रतिकुल अनुमान काढता येईल असे म्हटले आहे. ***मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रजनेश –वि– नेहा*** मध्ये दिलेल्या

निर्णयानुसार गैरअर्जदार हा अर्जदाराचे पालनपोषन करण्यास असमर्थ आहे हे सिध्द करण्याची जबाबदारी गैरअर्जदाराची असते. प्रस्तूत प्रकरणात गैरअर्जदार क्र. १ ने त्याच्या लेखी जबाबामध्ये असे कथन केले आहे की तो शेतामध्ये मजुरीच्या कामाला जातो. यावरुन हे स्पष्ट होते की, तो सुधृढ आहे. त्यामूळे तो अर्जदारांचे पालनपोषनाचा खर्च देण्याच्या जबाबदारीपासून पळून जावू शकत नाही. अर्जदारने गैरअर्जदार क्र. १ च्या उत्पन्नाबाबत कुठलाही कागदोपत्री पुरावा दिला नाही. अशा परिस्थीतीत, वरील बाबींचा विचार करता अर्जदार हिला दरमहा रुपये ३,०००/– (तीन हजार रुपये) असा आर्थीक सहाय्य मंजूर करणे मला योग्य वाटते. करीता मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज अंशतः मंजुर झालेला आहे.

२. गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदारला दरमहा रुपये ३,०००/– (रुपये तीन हजार) अंतरीम पोटगी मुख्य अर्ज दाखल झाल्याच्या तारखेपासून द्यावी.

३. दोन्ही पक्षांना प्रस्तूत आदेशाची प्रत विनामुल्य देण्यात यावी.

खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आले.

MADHURI KEWAL GOTE
Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2024.08.30 17:49:40 +0530

दिनांक :– ३०/०८/२०२४

**(श्रीमती एम. के. गोटे)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(कोर्ट नं.२), शेगाव.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील मजकुर शब्द न शब्द मुळ निकालाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांवः– के. एस. देशमुख, लघुलेखक ग्रेड–३.

न्यायालयाचे नांवः– न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दुसरे कोर्ट, शेगांव.

दिनांकः–३०.०८.२०२४